**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २१ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **अमेरिकेत सरसकट १० टक्के आयात शुल्क लागू करण्याचा अध्यक्ष ट्रंप यांचा अंतरिम आदेश जारी.**
2. **देशातून नक्षलवादाचं समूळ उच्चाटन येत्या ३१ मार्चपर्यंत करण्याचा केंद्रीयगृहमंत्र्यांचा पुनरुच्चार.**
3. **गरिबांना परवडणाऱ्या घराची उपलब्धता करून देण्यासाठी संशोधनाच्या माध्यमातून डिझायनर योगदान देऊ शकतात - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा सल्ला.**
4. **राष्ट्रीय बांबू महोत्सवाला आजपासून नागपूर इथं प्रारंभ होणार.**

-----------------------------------------

डोनाल्ड ट्रम्प

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं ट्रम्पयांनी जगभरातल्या देशांवर लादलेलं शुल्क असंवैधानिक असल्याचा निर्णय दिल्यानंतर, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जागतिक पातळीवर १० टक्के आयात शुल्क लागू करण्याचा आदेश जारी केला आहे. या आदेशावर ट्रम्प यांनी स्वाक्षरी केली असून,तो तातडीनं लागू होणार आहे. भारतासह जगभरातल्या इतर देशांसाठीही हा आदेश लागू असेल. या आदेशामुळे भारतावरचं आयात शुल्क तात्पुरत्या स्वरूपात १० टक्क्यांपर्यंत खाली येईल असा खुलासाही ट्रम्प यांच्या प्रशासनानं केला आहे.

-----------------------------------------

विजय वडेट्टीवार

दरम्यान, भारत-अमेरिका नव्या व्यापार करारामुळे महाराष्ट्रातील कापूस, मका, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असल्याचा आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. या कराराविरोधात यवतमाळ येथे ७ मार्च रोजी आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली. असमान कररचनेमुळे शेतकरी उध्वस्त होतील, अशी टीका करत सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

-----------------------------------------

अमित शहा

देशातून नक्षलवादाचं समूळ उच्चाटन येत्या ३१ मार्चपर्यंत करण्याचा पुनरुच्चार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा  आज गुवाहाटी इथं केला. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या ८७ व्या स्थापना दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी पोलीस दलाच्या संचलनाचं निरीक्षण केलं. यावेळी त्यांनी सीआरपीएफच्या कार्याची प्रशंसा केली ते म्हणाले...

***(होल्ड बाईट- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा)***

-----------------------------------------

प्रतापराव जाधव

आयुर्वेदिक व आयुष उपचारांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने शेगाव येथे २५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली. बुलढाणा जिल्ह्यातील विसावा मैदान येथे होणाऱ्या या मेळाव्याचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमास देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात आयुर्वेद, योग, युनानी, सिद्ध व होमिओपॅथी उपचारांची मोफत सेवा व मार्गदर्शन दिले जाणार आहे. आयुष क्षेत्रात कार्यरत सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केंद्रीय मंत्री जाधव यांनी केले.

-----------------------------------------

मन की बात

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातूनदेशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रम शृंखलेचा १३१वा भाग असेल. सकाळी ११ वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, तसंच न्यूज ऑन ए आय आर ॲप वरुन ऐकता येईल.

-----------------------------------------

गडकरी

रियल इस्टेट क्षेत्रामध्ये डिझायनर्सनी केवळ उच्चभ्रू लोकांना आवडतील  अश्या इमारतींच्या आणि घराच्या डिझाईन मध्ये लक्ष केंद्रित केले आहे, परंतु गरिबांना परवडणाऱ्या घराची उपलब्धता करून देण्यासाठी संशोधनाच्या माध्यमातून डिझायनर योगदान देऊ शकतात असा सल्ला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिला.  डिझाईन शोकेस 26 अँड कॉनफ्लुएन्स 3.0, या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंटिरियर डिझायनर तर्फे नागपूरच्या चिटणवीस सेंटर येथे आयोजित कार्यक्रमात ते उपस्थित यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. रियल इस्टेट क्षेत्रात परवडणारी घरं तयार करणं हि काळाची गरज असल्याचे ते म्हणाले -

***(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी)***

नफ्यासाठी 40% आणि लोकोपयोगासाठी अशाप्रकारे व्यवसाय करण्याचा हितोपदेश त्यांनी युवा डिझायनर्सला दिला. कमी दरात आणि उच्च दर्जाचे घर जनसामान्यांना तसेच गोरगरिबांना उपलब्ध व्हावे हा ध्यास मनात ठेवून डिझायनिंग केल्यास त्याचा मोठ्या प्रमाणात लाभ होईल असं ते म्हणाले.

----------------------------------------

राष्ट्रीय बांबू महोत्सव

राष्ट्रीय बांबू महोत्सवाला आजपासून नागपूर इथं प्रारंभ होत आहे. येत्या २७ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवाचं उद्घाटन आज सायंकाळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे. महोत्सवातल्या“बॅम्बू बीट्स अँड बिर्याणी” या उद्घाटन सोहळ्यात बांबू ऑर्केस्ट्रा आणि बांबू फूड शो सादर केला जाणार आहे. या महोत्सवात बांबूचा वापर करुन बांधकाम, उत्पादन डिझाईन, दागिने निर्मिती अशा विविध कार्यशाळांचं आयोजन करण्यात आलं आहे. तसंच शाश्वत बांबू शेती, कार्बन ऑफसेट आणि पाच दिवसांचा प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रमही होणार आहे. या महोत्सवात२५ तारखेला शेतभेट कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून, बांबू शेतीचं प्रात्यक्षिक दाखवलं जाणार आहे.

----------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

सौर ऊर्जेच्या वापराला प्राधान्य देत नगरपालिका व नगरपंचायतींनी कार्यालये व पथदिव्यांसाठी सोलार प्रणाली राबवाव्यात, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. प्रत्येक नगरपालिका क्षेत्रात किमान ३ ते ५ क्रीडांगणे विकसित करण्यावर भर देण्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पाणीपुरवठा, स्वच्छता, प्रधानमंत्री आवास योजना, आरोग्य व शिक्षण सुविधांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. एसटी बसेस वेळेवर थांबत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करत विद्यार्थ्यांना त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

----------------------------------------

निधन-रंजनाताई कवाडे

पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि माजी खासदार प्रा.जोगेंद्र कवाडे यांच्या पत्नि रंजनाताई कवाडे यांचे आज पहाटे 4 वाजता नागपुरात दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७७ वर्षांच्या होत्या. पीपल्स रिपब्लिकन पार्टी (पीरिपा)चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तसेच महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष जयदीप कवाडे यांच्या त्या आई होत्या त्यांनी पीपल्स रिपब्लिकन पार्टीसह रिपब्लिकन युथ फोर्स, रमाई महिला ब्रिगेड, दलित मुक्ती सेना, राष्ट्रीय मजदूर सेना आणि राष्ट्रीय

विद्यार्थी सेनेच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांच्यावर मोक्षधाम घाट इथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

-----------------------------------------

टी ट्वेंटी विश्वचषक

टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुपर एट गटाचेसामने आज पासून सुरु होत आहेत. पहिला सामना पाकिस्तान आणि न्यूझीलंड दरम्यान कोलंबो इथं होईल. सामना संध्याकाळी ७ वाजता सुरु होईल. भारत, वेस्ट इंडीज, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, श्रीलंका, न्यूझीलंड, झिंबाब्वे, आणि पाकिस्तान हे देश सुपर एटमधे पोहोचले आहेत. भारताचा सामना उद्या दक्षिण आफ्रिकेबरोबर अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर होणार आहे.

-----------------------------------------

अर्थसंकल्पीय अधिवेशन

राज्य विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन परवा सोमवारी २३ तारखेपासून मुंबईत सुरु होत आहे. राज्यपालांच्या अभिभाषणानं अधिवेशनाची सुरुवात होणार असून, त्यानंतर माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव सादर होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत.

-----------------------------------------

‘उमेद’ मॉल

अकोल्यात महिला बचत गटांसाठी २०कोटी रुपयांच्या निधीतून ‘उमेद’ मॉल उभारण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी दिली.या मॉलमुळे बचत गटांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. अकोला येथे आयोजित वऱ्हाडी जत्रा सरस विभागीय प्रदर्शनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. प्रदर्शन २४ फेब्रुवारीपर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे.

-----------------------------------------

रोहित पवार

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची स्वतंत्र चौकशी करावी आणि नागरी उड्डाण मंत्री के.राममोहन नायडू यांना पदावरुन हटवावं, अशी मागणी करणारं पत्र आमदार रोहित पवार यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लिहिलं आहे. अपघातग्रस्त विमान ज्या कंपनीचं होतं, त्या व्हीएसआर कंपनीचा नायडू यांच्या पक्षाशी घनिष्ट संबंध असल्याचा आरोप पवारयांनी केला आहे. या पत्राची एक प्रत केंद्रीय गृहमंत्री अमितशहा यांनाही देण्यात आली आहे.

-------------------------------------------

मार्गदर्शक तत्त्वं

एआयच्या मदतीनं तयार होणाऱ्या डिजिटल सामग्रीबाबत केंद्र सरकारने कडक मार्गदर्शकतत्त्वं लागू केली आहेत. गेल्या १० फेब्रुवारीला अधिसूचना जारी झाल्यानंतर हे नियम कालपासून अमलात आले. आता एखादं छायाचित्र, दृश्यफीत किंवा ध्वनिफित, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीनं तयार केलेली असेल, तर त्यावर स्पष्टपणे तशी सूचना देणं बंधनकारक करण्यात आलं आहे. प्रत्येक एआय-निर्मित सामग्रीच्या कोपऱ्यात 'एआय जनरेटेड' किंवा तत्सम सूचना स्पष्टपणे दाखवणं अनिवार्य असणार आहे.

-------------------------------------------